शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे सायंदैनिक

# प्राजक्त

आद्य संस्थापक व संपादक स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी

वर्ष : 52 अंक : 105 कोल्हापूर ता. 12 जुलै 2025/डाक ता. 13 जुलै 2025 किंमत 4 रुपये ✻ पाने 4 Postal Reg. No. KLR 136/24-26 Posted in Kolhapur RMS RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI

## हीरक महोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर

**४२८ ‘बी’ वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर – ४१६ ०१२. फोन नं. ०२३१–२५४६२२५, २९९१६७३, ७६२०५४६२२५**

**Website : www.kolhapurchitpavansangh.com/matrimony**

आता कोल्हापूर चित्पावन संघाच्या नवीन वेबसाईटवर घरबसल्या सर्व ब्राह्मण पोट–शाखेतील विवाहेच्छुक तरुण–तरुणींसाठी हजारो स्थळे पाहून आपल्या अनुरूप जोडीदाराची निवड करता येणार. सर्व ब्राह्मण वधूवरांसाठी ही मोठी सुवर्णसंधीच म्हणावी लागेल.

✻ देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, कण्व, सारस्वत, देवरुखे, दैवज्ञ इत्यादी सर्व ब्राह्मण पोटशाखांतील वधूवरांसहित मराठी, गुजराथी, कानडी व परप्रांतीय फक्त ब्राह्मण वधूवरांची घरबसल्या केव्हाही, कधीही आणि कितीही स्थळे पाहण्याची सोय !

✻ अत्यंत गोपनीय व सुरक्षित वेबसाईट, सहज सोप्या पद्धतीने फॉर्म भरण्याची सुविधा.

✻ केवळ स्थानिकच नव्हे तर संपूर्ण देशातील आणि जगभरातील ब्राह्मण वधूवरांची नोंदणीकृत स्थळांची माहिती उपलब्ध.

✻ आकर्षक तीन सवलत योजनेत विवाहेच्छूं–साठी ही पॅकेज उपलब्ध आहेत.

1) **श्रीपरशुराम पॅकेज – (एक वर्षासाठी)**

**स्वागत शुल्क रु.** 2,000

या पॅकेजमध्ये तुम्हाला एक वर्ष ऑफलाईन व एक वर्ष इंटरनेट नोंदणी मिळेल. यामध्ये वर्षभरात नोंदणी होणाऱ्या सर्व स्थळांची माहिती व संपर्क क्रमांक मिळतील. तसेच पसंतीच्या स्थळांना **S.M.S.** पाठविण्याची व चॅटची सुविधा मिळेल. आपले 10 फोटो अपलोड करण्याची सुविधा शिवाय संस्थेच्या ‘नवस्नेह’ मासिकात आपल्या स्थळाची माहिती एकदा प्रसिद्ध केली जाईल.

याचबरोबर पंचरत्न वधूवर सूचक केंद्र, कोल्हापूर यांचेकडून **pancharatnavivah.co.in** या वेबसाईट मधील 25 स्थळे किंवा तीन महिने मुदतीत मोफत पाहावयास मिळतील. (जो कालावधी लवकर पूर्ण होईल तो.) (अधिक माहितीसाठी संपर्क : 9881291863)

2) **श्रीयोगेश्वरी पॅकेज – (6 महिन्यांसाठी)**

**स्वागत शुल्क रु.** 1,500

या पॅकेजमध्ये तुम्हाला सहा महिने इंटरनेट नोंदणी मिळेल. त्याचबरोबर या पॅकेजमध्ये तुम्हाला 125 स्थळांची माहिती व संपर्क क्रमांक मिळतील. पसंतीच्या स्थळांना एस.एम.एस. पाठविण्याची व चॅटची सुविधाही तुम्हाला मिळेल. आपले 10 फोटो अपलोड करण्याची सुविधाही यामध्ये आहे.

3) **श्रीमहालक्ष्मी पॅकेज – (3 महिन्यांसाठी)**

**स्वागत शुल्क रु.** 1,000

यामध्ये नोंदणी करणाऱ्यांना तीन महिने इंटरनेट नोंदणी उपलब्ध असेल. 60 स्थळांचे संपर्क क्रमांक व माहिती मिळू शकेल. किमान 10 फोटो अपलोड करता येण्याची सुविधाही या पॅकेजमध्ये देण्यात आली आहे. उपवर ब्राह्मण तरुण–तरुणींनी आजच नोंदणी करून या सवलतीच्या पॅकेजचा लाभ घ्यावा. संघाच्या माध्यमातून आपला विवाह लवकरच संपन्न व्हावा या शुभेच्छा !

– **केदार जोशी,** कार्यवाह

## कोल्हापूर चित्पावन संघाच्यावतीने सभासदांना खाद्य महोत्सवामार्फत खास प्रोत्साहन

हीरक महोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाच्यावतीने वर्षभर अनेक उपक्रम केले जातात. यावर्षी असाच एक उपक्रम आपण आयोजित करत आहोत. आपल्यातील अनेकांना किचनमध्ये काही ना काही लुडबूड करून नवनवीन पदार्थ करून खायला घालण्याची सवय असतेच. हीच सवय तुम्हाला उत्तम शेफ बनवू शकेल, याची परीक्षाच म्हणा ना. तुम्हाला द्यायची आहे. तर योजना अशी आहे.

शनिवार, दि. २६ जुलै २०२५ रोजी ब्राह्मण सभा करवीर येथे आपल्या बांधवांसाठी एक कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमात आपण एक स्टॉल आरक्षित करायचा आहे. त्याच्या सूचना व नियम खालीलप्रमाणे आहेत.

**चित्पावन खाद्य माहोत्सव २०२५** – (१) यामध्ये प्रत्येकी एक स्टॉल देण्यात येईल. (२) प्रथम येणाऱ्यास प्रथम संधी दिली जाईल. (३) स्टॉलसाठी बुकिंग सहभाग शुल्क रु. २०० भरणे आवश्यक आहे. (४) फक्त चित्पावन सभासदांनाच स्टॉल देण्यात येईल. (५) एकाप्रकारच्या खाद्यपदार्थाचा एकच स्टॉल देण्यात येईल. (६) सर्व खाद्य पदार्थ स्टॉल धारकांनी स्वतः बनवून आणायचे आहेत. (७) बाहेरील कोणताही तयार पदार्थ आणू नये. (८) खाद्य पदार्थाची किंमत रु. ५० पेक्षा जास्त असू नये. जेणे करून खवय्यांना याचा मनसोक्त उपभोग घेता येईल. (९) पदार्थ गरम करण्याचे साहित्य, डिश, चमचे, इ. साहित्य स्वतः आणावयाचे आहे. (१०) मर्यादित स्टॉल असल्याने लवकरात लवकर सहभाग शुल्क भरून आपला स्टॉल आजच आरक्षित करा व आपल्या मनातील व्यावसायिकास जागृत करा.

**विशेष सूचना** – या दिवशी कार्यक्रमाच्या आधी चित्पावन संघाच्या शैक्षणिक गुणगौरव उपक्रमांतर्गत बक्षिस वितरण समारंभ ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम हॉल येथे होणार आहे. यानंतर आपला खाद्य महोत्सव होणार आहे. या कार्यक्रमात सहभागी सभासद, विद्यार्थी, सत्कारमूर्ती, यांना प्रत्येकी एक खाद्य महोत्सवाचे कुपन संघातर्फे मोफत देण्यात येणार आहे. हा आगळा वेगळा महोत्सव यशस्वी करावे असे आवाहन संघाचे अध्यक्ष श्री. मकरंद करंदीकर व कार्यवाह श्री. केदार जोशी यांनी केले आहे.


हीरकमहोत्सवी



**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

**कोल्हापूर.**

**विविध गुणगौरव व सत्कार समारंभ २०२५**

सस्नेह निमंत्रण

आदर्श माता
**श्रीमती वैशाली वसंत पोंक्षे**

वैदिक सन्मान
**वे.मू.महादेव वासुदेव जोशी तथा बिडकर गुरुजी**

सामाजिक कार्यकर्ती
**सौ. जयश्री केशव भागवत**

पत्रकार सन्मान
**श्री. समीर देशपांडे, लोकमत**

विशेष सत्कार
**श्री. केशव दत्तात्रय भावे (भावेकाका)**
**श्री. दिगंबर कृष्णाजी तथा डी. के. जोशी**

प्रमुख पाहुणे : **मा. जयंतराव वामन बर्वे**

**प्रसाद भिडे** - उपाध्यक्ष **मकरंद करंदीकर** - अध्यक्ष
**केदार जोशी** - सचिव
सर्व संचालक मंडळ - कोल्हापूर चित्पावन संघ

**माधव करंदीकर**, उपाध्यक्ष **मुकुंद गोरे**, अध्यक्ष
सर्व संचालक मंडळ - परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या.

**शनिवार, दि. २६ जुलै २०२५ रोजी सायं. ४ वाजता**
**स्थळ : ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम, कोल्हापूर.**


## कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.) कोल्हापूर.

४२८, ‘तुळजाभवानी संकुल’, बी वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर–४१६ ०१२.

### ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

स. न. वि. वि.

कोल्हापूर चित्पावन संघाची ६१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २७ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथे घेण्याचे आयोजित केले आहे. सर्व सभासदांना विनंती करण्यात येते की, आपण या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**✻ सभेपुढील विषय ✻**

१) मागील सभा दि. २५–८–२०२४ रोजीचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) दि. ३१–३–२०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षातील ताळेबंदास मंजुरी देणे.
३) सन २०२५–२६ साठी अंदाजपत्रक मंजूर करणे.
४) सुवर्ण चतुष्कोन निधीचा आढावा व संकल्पपूर्ती नियोजन व चर्चा करणे.
५) लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.
६) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

येणे प्रमाणे असे. ता. ११–०७–२०२५
संचालक मंडळाच्या आदेशावरून …

**केदार जोशी**, कार्यवाह **मकरंद विष्णू करंदीकर**, अध्यक्ष

**व सर्व संचालक मंडळ**

**सूचना** – (१) गणपूर्ती अभावी वरील बैठक तहकूब झाल्यास ती अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी घेण्यात येईल. अशा बैठकीस गणपूर्तीचे बंधन असणार नाही. (२) ज्या सभासदांना सूचना अगर प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी संस्थेमध्ये शुक्रवार दि. १८–७–२०२५ पर्यंत लेखी द्यावेत.

## श्री परशुराम नागरी सहकारी पत संस्था मर्यादित, कोल्हापूर

२६९७/अ, ‘ए’ वॉर्ड, ‘श्री परशुराम भवन’, कोठीशाळा रोड, महाद्वार रोड कॉर्नर, कोल्हापूर ४१६०१२. पॅन क्र. **AADAS0099R**

### अधिमंडळाच्या २८ व्या वार्षिक बैठकीची सूचना

(फक्त सभासदांकरिता)

**स. न. वि. वि.**

श्री परशुराम नागरी सहकारी पत संस्था मर्यादित, कोल्हापूर या सहकारी संस्थेच्या अधिमंडळाची वार्षिक बैठक **रविवार दि. २७ जुलै, २०२५ रोजी सकाळी १० वाजता ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम, मंगळवार पेठ, कोल्हापूर** येथे संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. गोपाळ विनायक गोरे यांच्या अध्यक्षतेखाली पुढील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलावण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**✻ बैठकीपुढील विषय सूची ✻**

१) मागील सभा दि. २५–८–२०२४ रोजीचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) सन २०२४–२५ चा अहवाल, लेखापरीक्षण झालेला ताळेबंद, नफा–तोटा पत्रक यांना मंजुरी देणे.
३) सन २०२४–२५ सालच्या नफा विभागणीस संचालक मंडळाने मंजूर केलेल्या लाभांश मंजुरीची नोंद घेणे.
४) सन २०२४–२५ च्या खर्चाच्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी व २०२५–२६ साठी संचालक मंडळाने शिफारस केलेले अंदाजपत्रक मंजूर करणे.
५) सन २०२४–२५ च्या शासकीय लेखापरीक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे.
६) सन २०२५–२६ करिता संचालक मंडळाने नेमलेल्या शासकीय लेखापरीक्षकाची नोंद घेणे.
७) सन २०२४–२५ मध्ये संचालकांना, त्यांचे नातेवाईकांना व संचालक जेथे भागीदार आहेत अशा संस्थेला दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
८) सन २०२३–२४ चा दोषदुरुस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.
९) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरून…
स्थळ : कोल्हापूर दि. ११–०७–२०२५

| | | |
|---|---|---|
| **सौ. सुप्रिया अ. खाडिलकर** | **माधव शामराव करंदीकर** | **गोपाळ विनायक गोरे** |
| सचिव | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

**व सर्व संचालक मंडळ**

**सूचना** – (१) गणपूर्ती अभावी वरील बैठक तहकूब झाल्यास ती अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी त्याच ठिकाणी घेण्यात येईल. अशा बैठकीस गणपूर्तीचे बंधन असणार नाही. (२) ज्या सभासदांना सूचना अगर प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी संस्थेमध्ये शुक्रवार दि. १८–७–२०२५ पर्यंत लेखी द्यावेत.

हीरक महोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.) कोल्हापूर.


श्री परशुराम नागरी सहकारी पत संस्था मर्यादित, कोल्हापूर

# विद्यार्थी गुणगौरव व सत्कार समारंभ २०२५

# सस्नेह निमंत्रण

## प्रमुख पाहुणे : कृषी संशोधक श्री. जयंत वामन बर्वे

उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी ही उक्ती सर्वश्रुत आहे. परंतु आज व्यापार / व्यवसाय आणि नोकरी हे उत्तम समजले जाते. शेतीकडे मात्र दुर्लक्ष केले जाते. आज ग्लोबल व्हिलेज या संकल्पनेतील ग्लोबलचे ग्लोबलायझेशन जास्त झाले असून विलेज फक्त नावापुरतेच राहिले आहे. आज भारतातील खेड्यांनाही शहरीकरणाचे आकर्षण आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय शेतीकडे दुर्लक्ष होऊ लागले आहे आणि कार्पोरेट बिजनेस मधील नोकऱ्यांकडे ग्रामीण युवक आकर्षित होत आहेत. अशा काळात श्री. जयंत बर्वे हे शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करण्यात गुंतलेले आहेत. शेतकऱ्यांना साक्षर करून त्यांचे प्रबोधन करणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय आहे. अशा या ध्येयवेड्या कृषी संशोधकाची वाटचाल फारच प्रेरणादायक आहे.



श्री. जयंत बर्वे हे एम.एस्सी. फिजिक्स ही पदव्युत्तर पदवी घेऊन राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा पुणे येथे संशोधक म्हणून रुजू झाले. सांगली जिल्ह्यातील विटा येथील श्री. बर्वे नोकरीनिमित्त पुणे येथे स्थायिक झाले. संशोधन कार्याबरोबरच ते पुण्यातील नामांकित कॉलेज मॉडर्न कॉलेज येथे अध्यापन कार्यही करत होते. मॉडर्न कॉलेजचे अध्यापनाचे कार्य आणि एन.सी.एल.मधील संशोधन कार्य त्यांच्या मूळच्या जिज्ञासू वृत्तीला पोषक असल्याने या दोनही गोष्टी त्यांच्यासाठी आनंददायकच होत्या. तरीही आपले मूळ गाव आपले घर त्यांना तेवढेच प्रिय होते, त्यांची नाळ तिथे जोडलेली होती. यामुळेच त्यांच्या वडिलांनी जेव्हा त्यांना विचारले की गावाकडे कधी येतोयस? तू तुझ्या संशोधनाचा उपयोग आपल्या गावासाठी करू शकशील का, तेव्हा त्यांच्या मनातही द्वंद्व सुरू झाले, पुण्यातच राहायचे की विट्याला जाऊन वडिलांच्या इच्छेला मान द्यायचा. वडिलांच्या इच्छेनुसार काम करायचे ? रुळलेली वाट सोडून नवीन कामाचा आरंभ करणे मोठे आव्हान होते. त्यांच्या मूळच्या जिज्ञासू वृत्तीला वडिलांनी आव्हानच दिले होते. अखेर विचारांती त्यांनी वडिलांचे आव्हान स्वीकारायचे ठरवले. वडिलांची इच्छा शिरसावंद्य मानून ते आपल्या मूळ गावी परत आले. तेथे त्यांनी केमिकल फॅक्टरी सुरू केली. फॅक्टरीमध्ये 'पॅरा नायट्रो अनिलिन' या आयात कराव्या लागणाऱ्या पदार्थाचे उत्पादन सुरू केले. त्यांची कल्पकता व मूळ जिज्ञासमृद्धी यामुळे हे धाडस ते करू शकले. याचा फायदा अनेक जणांना झाला व त्याद्वारे त्यांचे नाव पंचक्रोशीत झाले. त्यांच्या या कार्याबद्दल १९७७ मध्ये मराठा चेंबर ऑफ कॉमर्स यांचेकडून ' पारखे पुरस्काराने' त्यांना सन्मानित करण्यात आले. परंतु शासनाच्या बदलत्या आयात धोरणामुळे त्यांना सुस्थितीतील आपला व्यवसाय पूर्णपणे बंद करावा लागला. परिस्थितीने खचून न जाता परत नव्याने सुरुवात केली. त्यांनी रासायनिक खते आणि कीटकनाशके या उत्पादनांचे विपणन सल्लागार म्हणून काम सुरू केले त्यांचा जनसंपर्क दांडगा असल्यामुळे स्थानिक शेतकरी त्यांच्या प्रयोगशाळेत माती परीक्षण करून घेण्यास येत असत. त्यांच्याशी बोलताना ते अशा शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार रसायने सुचवत असत. ज्यामुळे त्यांची पीक समस्या दूर होत असे. शेतकऱ्यांना वेळोवेळी केलेल्या मदतीमुळे अनेक जण त्यांच्या संपर्कात होते व आपल्या समस्यांबाबत ते त्यांच्याशी चर्चाही करत. यातूनच एक प्रसंग त्यांच्या जीवनाला पूर्ण कलाटणी देणारा ठरला. एका द्राक्ष बागायतदाराने त्यांच्याकडे कावळे हुसकावून लावण्यासाठी काही रसायन आहे का अशी विचारणा केली. प्रश्न एकूण त्यांना गंमत वाटली तरीही त्यांनी त्याची समस्या पूर्ण एकाग्रतेने ऐकून घेतली. तो बागायतदार म्हणाला कावळे द्राक्ष घडांचे फार नुकसान करतात. त्यांना पिकापासून दूर ठेवण्यासाठी एखाद्या जालीम रसायनाची आवश्यकता होती. पण यात एक अडचण अशी होती की तोडणीला आठवड्याचा कालावधी असताना पिकावर अशी फवारणी केली असता त्या द्राक्षांमध्ये त्या रसायनांचे अंश जमा राहिले असते, याचे पुढे होणारे परिणाम........ बापरे !

याप्रसंगामुळे ते रासायनिक शेती कडून नैसर्गिक सेंद्रिय शेतीकडे वळले. ज्याद्वारे पूर्ण नैसर्गिक पर्यावरण पूरक सकस आणि भरघोस उत्पादन घेता येईल. विचाराला नवी दिशा मिळाली आणि यावर विचार करणे सुरू झाले.

परत नव्याने श्री गणेशा करत नैसर्गिक शेतीचा आगळावेगळा प्रयोग सुरू झाला. नैसर्गिक शेतीचे प्रयोग त्यांनी आपल्या शेतात सुरू केले. आपली बाग प्रमाणित करून घेऊन त्यांनी स्थानिक शेतकऱ्यांना एक आदर्श घालून दिला. त्यांनी आपल्या आजूबाजूचा अस्ताव्यस्त पसरलेल्या विघटनशील कचऱ्यापासून खत निर्मिती सुरू केली व इतरांनाही याची जाणीव करून दिली. यामुळे नैसर्गिक शेतीला एक नवी दिशा मिळाली तसेच दुसरीकडे शहरी कचरा व्यवस्थापन सोयीचे झाले. त्यांच्या याच कार्याचा गौरव १९९६ मध्ये 'फाय फाउंडेशन' पुरस्काराने केला गेला.

नैसर्गिक शेतीचे कार्य व्यापक स्तरावर सुरू झाले होते. यातूनच ऑरगॅनिक फार्मिंग असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेचे ते संस्थापक सदस्य आहेत. महाराष्ट्र ऑरगॅनिक फेडरेशन मध्ये ते सक्रिय असून सेंद्रिय शेतीचा प्रचार आणि प्रसार ते हिरीरिने करतात. सृजनशीलता हे जिवंतपणाचे लक्षण आहे. आज हे त्यांचे जीवनसूत्र बनले आहे. थांबला तो संपला हे जाणून ते सतत नाविन्याच्या शोधात असतात. गांडूळ शेती, जैवविविधता युक्त शेती यातून शेती या विषयांची नवीन माहिती ते घेत असतात. सेंद्रिय शेती या विषयातील ज्ञानाचा उपयोग करून अन्य शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीकडे वळवणे हे त्यांचे कर्तव्य समजतात यासाठी व्याख्याने, परिसंवाद आणि कार्यशाळेद्वारे ते विद्यार्थी, शेतकरी संशोधक यांच्यासाठी मार्गदर्शन करतात. आपल्या आजवरच्या अनुभवातून त्यांनी 'वसुंधरा' आणि 'पंचगव्य' या पुस्तकांचे लेखनही केले आहे. ते 'सेंद्रिय विचार' नावाचे मासिक प्रकाशित करतात, जे पूर्ण महाराष्ट्रात विनामूल्य वितरित केले जाते.

आपले विचार मासिकातल्या लेखांमधून, रेडिओ टेलिव्हिजन या माध्यमातून ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवतात. विविध मार्गाने ते शेतकऱ्यांच्या संपर्कात राहतात, म्हणूनच त्यांच्या जीवनावर आधारित माहितीपट 'डीडी किसान' वाहिनीने बनवला आहे. ज्यात रासायनिक कारखानदार ते सेंद्रिय कृषी तज्ज्ञ हा त्यांचा जीवन प्रवास चित्रित करण्यात आला आहे. अनेक वर्षाच्या त्यांच्या अनुभवातून संशोधनातून आणि वृक्ष आयुर्वेद कृषी पराशर यासारख्या आद्य भारतीय ग्रंथांच्या अभ्यासातून त्यांनी सेंद्रिय खताची निर्मिती ही केलेली आहे. नेचर केअर फर्टीलायझर (एन. सी. एफ.) द्वारा ग्रीन हार्वेस्ट या प्रमाणित सेंद्रिय खताची निर्मिती केली जाते. ग्रीन हार्वेस्ट इतर कंपोस्ट खताच्या तुलनेत एक बहुउपयोगी खत आहे. या खताने पिकासाठी, मातीसाठी लागणाऱ्या अनेक घटकांची पूर्तता होते. शेतकऱ्याला वेळोवेळी द्याव्या लागणाऱ्या खता ऐवजी हे एकच खत एवढे प्रभावी आहे की त्यामुळे शेतकऱ्याचा वेळ पैसा श्रम याची बचत होते. पारंपारिक रासायनिक खतांना 'ग्रीन हार्वेस्ट' हा उत्तम पर्याय आहे. याच्या वापराने शेतकऱ्यांना आश्चर्यकारक आणि लक्षणीय लाभ होत आहे.

रासायनिक खते व कीटकनाशकांच्या वापराने विषयुक्त होणारी वसुंधरा विषमुक्त व्हावी हे जयंत बर्वे यांचे ध्येय असून त्यासाठी ते कार्यरत आहेत पिकांचे अवशिष्ट भाग व शेतीतील इतर घटकांचा वापर करून जमिनीचा पोत सुधारून त्याचा कस कसा वाढेल याचे प्रशिक्षण ते शेतकऱ्यांना देत असतात. जमिनीचा कस वाढवण्याबरोबरच कीड व पिकांवरील रोगांचे नियंत्रण प्राचीन कृषी तंत्राद्वारे कसे करता येईल याविषयी शेतकऱ्यांचे प्रबोधन करतात. सातत्यपूर्ण पीक उत्पादन देणारे कमी खर्चाचे हे अद्वितीय तंत्रज्ञान छोट्या शेतकऱ्यांपासून मोठ्या भागात बागायतदारांपर्यंत लाभदायक होत आहे ठरत आहे. भारतातच नव्हे तर आफ्रिकेतील देशांमध्येही शेतकरी या तंत्रज्ञानाचा लाभ घेत आहेत. महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यात ६३० शेतकऱ्यांनी पंधराशे एकर जमिनीत सेंद्रिय शेतीचा प्रयोग श्री. जयंत बर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केला असून यातून ते विविध पिके घेत आहेत.

आपल्या ध्येयाकडे एक पाऊल पुढे टाकताना ते **SAVE SOIL SAVE NATION** माती वाचवा देश वाचवा हा नारा सर्वांपर्यंत पोहोचवतात कृषी क्षेत्रातील आजपर्यंत केलेल्या योगदानाबद्दल त्यांना २०१९ चा 'ॲग्रोवन ॲग्री बिजनेस एक्सलन्स' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याआधीही २०१२ चा 'मोरोपंत पिंगळे गोसेवा पुरस्कार' व २०१३ चा 'उद्योग श्री' पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे. पण एवढे असूनही त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा पुरस्कार म्हणजे त्यांची परंपरा पुढे सुरू ठेवणारे त्यांचा वारसा जपणारे त्यांचे सुपुत्र जे सूक्ष्मजीव शास्त्रज्ञ आहेत व नातू जे त्यांचे परंपरा जपत त्यांचा वारसा पुढे चालवत आहेत. हा वारसा म्हणजे काळ्या आईने त्यांना दिलेले वरदानच आहे, अशी त्यांची कृतज्ञतेची भावना आहे. शेवटी म्हणावेसे वाटते की सतत नाविन्याचा ध्यास घेतलेला ध्येयवेडा पुढे जात आहे बाकीच्यांची प्रेरणा बनून !

## आदर्श माता ; श्रीमती वैशाली वसंत पोंक्षे

पूर्वाश्रमीच्या कु. आशा वामन आपटे यांचा जन्म कोल्हापुरातील आपटे कुटुंबात झाला. त्या पाच भावंडांमध्ये सर्वात ज्येष्ठ. पाठीवर दोन बहिणी आणि दोन भाऊ. घरचा किराणामालाचा व्यवसाय. लहानपणापासूनच त्यांना नीटनेटकेपणाची आवड आणि जे काम करायचे ते उत्तम रीतीनेच त्यांचा आपला मूळ स्वभाव. एम. ए. पर्यंत त्यांचे शिक्षण झाले. उत्तम गुणांसह मराठी विषयात त्यांनी पदवी मिळवली आणि बँकेत अधिकारी असणाऱ्या श्री. वसंत पोंक्षे यांच्याशी त्यांचा विवाह होऊन त्या सौ. वैशाली वसंत पोंक्षे झाल्या. पतीच्या नोकरीमुळे त्यांचे तासगाव, विटा, गडहिंग्लज, कराड येथे वास्तव्य झाले. मुलगी आणि मुलाचे शिक्षण सुरू असतानाच एप्रिल २००० मध्ये अपघातात पतीचे अचानक निधन झाले आणि आपल्या आयुष्यात मोठी पोकळी निर्माण झाली. मात्र मन खंबीर करून माहेरच्या पाठिंब्यावर कोल्हापुरात स्थायिक झाल्या. घरगुती स्वरूपात फराळाचे पदार्थ तयार करून त्याची विक्री त्यांनी सुरू केली. पदार्थांची चव आणि दर्जा ग्राहकांच्या पसंतीला उतरला आणि ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात तोंडी प्रचार झाल्याने त्यांनाव्यवसायात मोठी उभारी घेता आली. मुलांचे शिक्षण पूर्ण करून त्यांना आपल्या पायावर उभे केले. आज त्यांच्या कन्या-जामात अमेरिकेत स्थायिक असून, मुलगा आणि सून बहुराष्ट्रीय कंपनीत मुंबई आणि पुणे येथे कार्यरत आहेत. मायेच्या दोन नातवंडांच्या त्या आजी आहेत.



सासर आणि माहेरच्या दोन्ही कुटुंबांतील अध्यात्माची आवड तुम्ही प्रयत्नपूर्वक जोपासली आहे. आदरणीय भावेकाकांच्या स्तोत्र पठण वर्गात आपण सक्रिय सहभागी आहात. आज सत्तरीनंतरही आरोग्य सांभाळून पती पश्चात कुटुंबातील विहित कर्तव्ये व्यवस्थित रितीने पार पाडत व्यवसायात मग्न आहात.

***

## पत्रकार सन्मान : श्री. समीर सुधाकर देशपांडे

कोल्हापूर चित्पावन संघाचा 'पत्रकार सन्मान' पुरस्कार श्री. समीर देशपांडे यांना जाहिर झाला आहे.



दैनिक लोकमत, कोल्हापूमध्ये वरिष्ठ वार्ताहर म्हणून ते सध्या कार्यरत आहेत. यापूर्वी दैनिक तरुण भारत, भास्कर समूहाचे दिव्या मराठी अशा प्रमुख वृत्तपत्रांत वरिष्ठ पदावर त्यांनी काम केले आहे. आपल्या बातमीदारीच्या काळात विविध ठिकाणी आणि विविध विषयांवर त्यांनी विपुल लेखन केले. त्यात सांस्कृतिक आणि साहित्यक विषयांबरोबर राजकारण, ग्रामीण विकास, शासकीय योजना आणि त्यांची अंमलबजावणी अशा सामाजिक विषयांवरील लेखनाचा समावेश आहे. याच अनुभवावर आधारित त्यांचे 'गाथा ग्रामविकासाची' हे कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून पुढील ६० वर्षांच्या विकासकामांचा आढावा घेणारे पुस्तक प्रसिद्ध झाले. याशिवाय विख्यात शिक्षणतज्ज्ञ कै. जे. पी. नाईक, विख्यात कादंबरीकार कै. शिवाजीराव सावंत आणि विख्यात संपादक, पत्रकार कै. ग. वा. बेहेरे सोबतकार आदी आजरेकरांच्या स्मृतींना उजाळा देणारे 'प्रतिभावंतांचे आजरे' हे पुस्तक त्यांनी लिहिले आहे.

आकाशवाणी सांगली आणि कोल्हापूर केंद्रावरून त्यांनी विविध विषयांवर भाषणे आणि निवडणुकांचे वार्तांकन केले. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध पुरस्कारांसह कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर प्रेस क्लब, यांच्या अनेक पुरस्कारांचे त्यांना प्राप्त झाले. पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका देणारी कोल्हापूर, सांगली आणि सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांसाठी कार्यरत असणाऱ्या कोल्हापूर विभागीय आधिस्वीकृती समितीचे ते अध्यक्ष आहेत. 'निर्धार' संस्थेच्या माध्यमातून गेल्या २० वर्षांत त्यांनी अनेक साहित्यिक आणि सामाजिक कार्यक्रम आयोजित केले.

***

## सामाजिक कार्यकर्त्या : सौ. जयश्री केशव भागवत


रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील अंबव पोंक्षे या लहान खेडेगावात देवधर घराण्यात त्यांचा जन्म झाला. वडील प्राथमिक शिक्षक आणि आई उत्तम गृहिणी असल्यामुळे घरचे उत्तम वळण होते. त्यांचे जुन्या एस.एस.सी.पर्यंत शिक्षण झाले. कोल्हापुरातील केशव भागवत यांच्याशी त्यांचा विवाह झाला. लहानपणापासूनच शिस्त आणि सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे सांसारिक जबाबदारीतून मुक्त झाल्यावर त्यांनी समाजकार्यास वाहून घेतले. कोल्हापूर चित्पावन संघ आणि श्री परशुराम नागरी सहकारी पत संस्थेच्या संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. श्रीमहालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा, सार्वजनिक बोडण सोहळा, कोजागिरी कार्यक्रमात त्यांचा सक्रीय सहभाग असतो. मुलगा ॲड. श्री. आमोघ भागवत, सूनबाई सौ. अपर्णा आणि दोन नातींसह त्या समाजकारण व नामस्मरणात आपले निवृत्तीचे जीवन व्यतीत करीत आहेत.



***

## वैदिक सन्मान ; श्री. महादेव वासुदेव जोशी तथा बिडकर गुरुजी


कोल्हापूर चित्पावन संघातर्फे बिडकर गुरुजींचा वेदविद्यापारंगत, पंडित व्यक्तीचा 'वेदमूर्ती श्रीपाद काळे पुरस्कार' देऊन सन्मान होत आहे. बीड तालुक्यातील कुर्ला गावी दि. २३ मे, १९६३ साली त्यांचा जन्म झाला. इ. ७वीपर्यंत शालेय शिक्षणानंतर प.पू. चिन्मयानंदस्वामी मठ, उमरखेड (औदुंबर क्षेत्र), ता. उमरखेड, जि. यवतमाळ या विदर्भातील गुरु पुरुषोत्तमानंदस्वामी महाराजांचे सान्निध्यात सन १९७२ ते १९८२ या कालावधीत धार्मिक शिक्षण घेतले. वेदशास्त्र संपन्न (वेदभास्कर) विद्यागुरू श्री. राजारामबुवा जोशी, माजलगाव यांचेकडे त्यांनी यजुर्वेद संहिता व १७ भाष्ये, पदपाठ आणि याज्ञिकाचे अध्ययन केले. धार्मिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर बीड ग्रामी चार विद्यार्थ्यांना नित्यकर्म, रुद्रादी संथा दिली. १९८६ नंतर करवीरक्षेत्री कोल्हापुरात श्री. सी. एन. पाठक यांच्याकडे वास्तव्य. कोल्हापूर येथे पौरोहित्य व ५ ते ७ विद्यार्थ्यांना कर्मकाण्ड संथा आणि याज्ञिक शिक्षण दिले.



***

## समाजभूषण : आदरणीय श्री. भावेकाका

कोल्हापूर चित्पावन संघाशी स्थापनेपासून निगडित राहिलेले श्री. केशव भावेकाका यांना 'समाजभूषण' पुरस्काराने गौरविण्यात येत आहे. १९६२ साली वयाच्या २१व्या वर्षी कोकणातील रोह्यातून चरितार्थासाठी काका कोल्हापुरात आले. १९७० साली न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीत नोकरी लागली आणि २६ वर्षांनंतर १९९६ साली याच कंपनीतून डिव्हिजनल मॅनेजर पदावरून निवृत्त झाले. सुखी, समाधानी सांसारिक जीवनानंतर निवृत्तीचा काळ सुसंस्कारी समाज निर्मितीसाठी देऊन २००६ साली तुम्ही 'संस्कार गुरुकुलाची' स्थापना करुन सप्तशती पठण वर्गाची सुरुवात केली. त्यानंतर श्रीमहालक्ष्मी स्तोत्र पठण, रुद्र, पवमान स्तोत्र अशा कठीण स्तोत्रांच्या आरोह अवरोह युक्त पठणातही आपण अनेक स्त्री पुरुषांना पारंगत केले. या स्तोत्रांच्या, पूजापाठांच्या सुमारे आठ संग्राह्य पुस्तिका तयार करून त्यांच्या हजारो प्रती छापून विना नफा किंमतीत त्यांचे भाविकांत वाटप केले. श्रीराम प्रभू आणि समर्थ रामदास स्वामींचे काका निस्सीम भक्त आहेत. शिवथरघळ येथील श्री. सुंदरमठ सेवा समितीत १९९९ सालापासून १३ वर्षे पदाधिकारी म्हणून तुम्ही भरीव काम केले आहे. घळीतील भक्तनिवासाच्या बांधकामात खारीचा वाटा उचलण्यासाठी निःस्वार्थी भावनेने त्यांनी समितीला भरघोस देणगी देऊन या सामाजिक कार्याला सक्रिय हातभार लावला आहे.



***

## समाजभूषण : श्री. दिगंबर कृष्णाजी जोशी

श्री परशुराम नागरी सहकारी पत संस्थेचे ज्येष्ठ हितचिंतक श्री. दिगंबर जोशी यांना 'श्री. द. गो. कानिटकर जीवनगौरव पुरस्कार' प्रदान होत आहे. सन १९७४ मध्ये व्यवसायासाठी ते रत्नागिरीहून कोल्हापुरात आले. यामागे कोल्हापूरच्या अंबामातेची कृपा आणि ईश्वरी नियोजन असल्याची त्यांची श्रद्धा आहे. १९७६ मध्ये त्यांनी 'जागृती ट्रान्सपोर्ट'ची शाखा येथे सुरू केली आणि गेली ५० वर्षे आपल्या या व्यवसायाची भरभराट केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते सक्रीय कार्यकर्ते आहेत. सन १९९५ पासून आपली श्री पंचगंगा नागरी सहकारी बँकेत संचालकपदी निवड होऊन तीन वेळा बँकेचे उपाध्यक्षपद आणि एकदा अध्यक्षपदी काम करण्याची त्यांना संधी मिळाली. या काळात अनेक सामाजिक व राजकीय व्यक्तींचा सहवास मिळून निरनिराळ्या सामाजिक उपक्रमात आपणांस सक्रिय सहभाग घेता आला. कोल्हापूर लॉरी ऑपरेटर असोसिएशनमध्ये संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. कोल्हापूर चित्पावन संघ व श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्थेशी आपण स्थापनेपासून निगडित आहेत.



श्रीस्वामी शिवानंद यांच्याशी त्यांच्या घराण्याचे अत्यंत जवळचे सेवासंबंध असल्यामुळे त्यांना सन १९९० पासून सन २०२० पर्यंत ३० वर्षे गुरुसेवेची संधी मिळाली. पांगरे येथील शिवानंद महाराज ट्रस्टचे सचिव म्हणून काम करताना अनेक संतसज्जनांचा, सत्पुरुषांचा सहवास लाभला आणि आपली परमार्थाची वाटचाल सुरू झाली. त्या काळात वासुदेवशास्त्री टेंब्येस्वामी यांच्या पत्नी अन्नपूर्णामाता यांच्या गंगाखेड येथील समाधीचा तसेच प.पू. टेंब्येस्वामी महाराजांच्या गरुडेश्वर येथील समाधीचा जीर्णोद्धार करण्याचे सेवाकार्य त्यांच्याकडून घडले.

# हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाच्यावतीने सोमवार दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी श्रीमहालक्ष्मी अष्टमी जागर सोहळ्याचे आयोजन

कोल्हापूर – कोल्हापूर चित्पावन संघाच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही 'श्रीमहालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा' व 'महाप्रसाद' सोमवार दि. 29 सप्टेंबर 2025 रोजी ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम येथे साजरा करणेचे योजिले आहे. प्रत्येक ज्ञातीबांधवाने महाप्रसादाचा लाभ घ्यावा असा मानस आहे. त्यादृष्टीने संघाने नियोजनाची सुरुवात केली आहे, अशी माहिती संघाचे अध्यक्ष मकरंद करंदीकर, उपाध्यक्ष प्रसाद भिडे, कार्यवाह केदार जोशी यांनी दिली.

याविषयी सविस्तर माहिती देताना अध्यक्ष मकरंद करंदीकर पुढे म्हणाले, आपल्या कुटुंबातील किती सभासद प्रसादासाठी येणार आहेत याची नोंद संघाचे कार्यालय व श्री परशुराम पतसंस्था येथे प्रत्यक्ष भेटून अथवा फोन, व्हॉटस्‌ॲपवरून (7588839527) करावी. ज्यायोगे महाप्रसादाचे योग्य नियोजन करणे सोयीचे होईल. सर्व ज्ञातीबांधव शिस्तप्रिय असल्याने कार्यक्रमाचे योग्य नियोजन, महाप्रसाद तयार करण्यासाठीची तयारी, संभाव्य अपव्यय व गैरसोय टाळणे हा यामागील मुख्य उद्देश आहे. त्यादृष्टीने सर्वांनी आगाऊ नोंदणी करणे आवश्यक व अपेक्षित आहे.

गतवर्षी प्रमाणे यावर्षीही सोयीचे दृष्टीने 'महाप्रसाद पास' योजना करणेचे निश्चित केले आहे. आपण चितपावन संघ, श्री परशुराम पत संस्था येथे महाप्रसादासाठी नोंदणी करुन पास घेऊ शकता. तसेच संघाचे सर्व संचालक, सल्लागार व खाली दिलेल्या महिला प्रतिनिधी यांचेकडे नांव नोंदणी करुन पास घेऊ शकता. दूरवर राहणारे ज्ञातीबांधव फोन करुन देखील महाप्रसाद नोंदणी करु शकतात, त्यांना कार्यक्रमावेळी पास देण्याची व्यवस्था केली जाईल. नोंदणी व पास ही संकल्पना महाप्रसाद नियोजनासाठी राबविण्यात येत आहे, याची कृपया नोंद घ्यावी.आपण सहकार्याचा हात दिल्यास एक आदर्श महाप्रसाद नियोजन संपन्न होईल, याची आम्हास खात्री आहेच.

वशेळ्यांनी आपली नोंदणी कोल्हापूर चितपावन संघ व श्री परशुराम पतसंस्था व महिला प्रतिनिधी यांचेकडे प्रत्यक्ष, फोनवरुन अथवा व्हॉटस्‌ॲपद्वारे करावी. **त्याची नोंदणी फी रु. 251/- प्रत्येकी आहे याची नोंद घ्यावी.**

संस्थेचे उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे यांनी सांगितले की, अष्टमी जागर निमित्ताने आयोजित महाप्रसादासाठी सुमारे 1000 ज्ञातिबांधव सहभागी व्हावेत या दृष्टीने नियोजनाची आखणी करीत आहोत. महाप्रसादासाठी ज्ञातीबांधवांनी सढळ हाताने देणगी द्यावी. महाप्रसादासाठी लागणाऱ्या शिधाखर्चाची यादी दिली आहे. रोख रक्कम स्वरूपात देणगी दिल्यास आम्हाला संयुक्तपणे शिधा आणणे सोयीचे होईल. नियोजनाचे दृष्टीने आपण शिधाखर्च रोख अथवा पुढे दिलेल्या पर्यायांनी जमा करू शकता. अधिक माहितीसाठी संबंधितांनी

**कोल्हापूर चित्पावन संघ,**

**फोन :** 0231–2546225 / 2991673, **मो.** 7620546225

**श्री परशुराम नागरी सहकारी पत संस्था मर्या; कोल्हापूर.**

**मोबा.** 8857076163 **येथे संपर्क साधावा.**

**अधिक माहितीसाठी संघाच्या महिला प्रतिनिधींशी संपर्क साधावा.**

| | |
|---|---|
| **सौ. सीमा सुरेश गोखले** | 9420455159 |
| **सौ. संगीता संजय आपटे** | 8149480034 |
| **सौ. अर्चना मोहन दातार** | 9637248908 |
| **सौ. अश्विनी प्रसाद भिडे** | 9623674742 |
| **सौ. पंकजा गोरे** | 9421100047 |
| **सौ. माधुरी मकरंद करंदीकर** | 9765651169 |
| **सौ. अपूर्वा केळकर** | 9657865339 |
| **श्रीमती वासंती लिमये** | 9158859603 |

तसेच ज्या व्यक्तींना बँकेमध्ये पैसे पाठवायचे आहेत त्यांनी संस्थेच्या पुढील खात्यात रक्कम जमा करावी व त्याचा स्क्रीन शॉट पाठवावा. कृपया बँकेत पैसे जमा केल्यास रिमार्क जागेत आपले नाव अवश्य लिहावे.

**बँकेचे नाव –**
**बँक ऑफ इंडिया**
**बँकेची शाखा –**
**महाद्वार रोड, कोल्हापूर.**
**खाते नंबर –**
09021011001 6181

**IFSC Code - BKID0000902**

**गुगल पे नंबर –**

**कार्यवाह : केदार जोशी मो.** 7588839527

**श्री परशुराम नागरी सहकारी पत संस्था म., कोल्हापूर**

**मुदत ठेव**

| | |
|---|---|
| ४६ दिवस ते ९० दिवस | .........३% |
| ९१ दिवस ते १८० दिवस | .........५% |
| १८१ दिवस ते १ वर्ष | .........६% |
| १३ महिने | .........८% |
| २५ महिने | .........९% |


**रिकरिंग ठेव**

| | | |
|---|---|---|
| १ वर्ष | ७% | १,२४६-०० |
| १ वर्ष महालक्ष्मी ठेव (फक्त महिलांसाठी) | ८% | १,२५२-०० |
| २ वर्ष | ८% | २,६०९-०० |
| ३ वर्ष | ९% | ४,१४१-०० |

**कर्ज व्याजदर**

| | |
|---|---|
| वैयक्तिक किंवा विनातारणी कर्ज | १५% |
| तारणी कर्ज | १३% |

ठेव तारण कर्ज ठेवीच्या २% जादा आकारणी



हीरक महोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)

## श्रीमहालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा

## आमंत्रण आपुलकीचे !

प्रतिवर्षाप्रमाणे आपल्या संस्थेतर्फे याही वर्षी

**श्रीमहालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा**

**सोमवार दि. २९ सप्टेंबर, २०२५ रोजी ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर येथे संपन्न होणार आहे.**

कार्यक्रम सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत असतील. यामध्ये पूजा, श्रींची कहाणी वाचन, आरती, महानैवेद्य, श्रीदेवी मूर्ती प्रतिष्ठापना व दर्शन, मंत्रपठण, घागरी फुंकणे असा नियोजित कार्यक्रम होणार आहे. अष्टमी पूजनासाठी वशेळ्यांनी आगाऊ नांव नोंदणी करावी, ही विनंती.

| | |
|---|---|
| सकाळी 9 वा. | : स्वागत, नोंदणी, पूजेचे साहित्य वाटप. |
| सकाळी 10 वा. | : तुलसी पूजन व 'श्रीं'चे पूजेचा आरंभ, संकल्प. |
| सकाळी 11 ते 12 | : आरती, 'श्रीं'ची कहाणी वाचन, महानैवेद्य. |
| दुपारी 12 ते 2.30 | : महाप्रसाद |
| सायं. 7 वा. | : 'श्रीं'ची मूर्ती उभी करणे, पूजा, आरती, मंत्रपठण, नैवेद्य |
| सायं. 7.15 वा. | : 'श्रीं'चे दर्शन सर्वांसाठी खुले व घागरी फुंकणे, पारंपरिक गीते इत्यादी. |

*या कार्यक्रमासाठी सर्व पोटशाखेतील ज्ञातीबांधवांनी उपस्थित राहून सेवेचा, महाप्रसादाचा लाभ घ्यावा, ही विनंती.*

आपले स्नेहांकित,

| | | |
|---|---|---|
| **मकरंद करंदीकर** | **केदार जोशी** | **प्रसाद भिडे** |
| अध्यक्ष | सचिव | उपाध्यक्ष |
| 9421113005 | 7588839527 | 9822248500 |

**संचालक मंडळ :** नंदकुमार मराठे, सौ. संगीता आपटे, संतोष साने, किरण जोशी, सौ. सीमा गोखले, हृषिकेश लिमये, श्रीकांत लिमये, दत्ता आपटे

**सल्लागार समिती :** विष्णू वझे, मोहन दातार, शिरीष ताम्हणकर, निनाद खरे, महेश खाडिलकर, प्रसाद खाडिलकर

**वेळ : अश्विन शुद्ध 8, सोमवार, दि. 29 सप्टेंबर 2025**

**स्थळ : ब्राह्मण सभा करवीर, मंगलधाम, पहिला मजला, कोल्हापूर.**

### श्रीमहालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा

## कोल्हापूर चित्पावन संघातर्फे घरपोच प्रसाद योजना

आपल्या संघाच्यावतीने सोमवार दि. 29 सप्टेंबर 2025 रोजी दाते पंचागानुसार अष्टमी जागर सोहळा आयोजित केला आहे. सध्याच्या परिस्थितीत अनेक भाविकांना दर्शनासाठी येणे शक्य होत नाही. विशेषतः घरातील ज्येष्ठ मंडळी, लहान मुले, गर्भवती महिला आदि कुटुंबातील सदस्य इच्छा असूनही येऊ शकत नाहीत. यासाठी आपल्या संघाच्यावतीने 'श्रीं'चा प्रसाद आपल्या घरी पोहोचविण्याचा संकल्प केला आहे. यामध्ये हळद-कुंकू, लाडू, फुटाणे, सुरक्षित पिशवी यांचा समावेश आहे. तसेच आपल्या कुटुंबाच्या कल्याणासाठी संकल्प केला जाईल. **यासाठी आपण गुरुवार दि. 25 सप्टेंबर 2025 पर्यंत नोंदणी केल्यास प्रसाद आपल्या घरी गुरुवार दि. 2 ऑक्टोबर 2025 पासून 4–5 दिवसात कुरिअरने घरपोच मिळेल.** यासाठी एका प्रसादासाठी देणगी शुल्क केवळ रु. 351 देण्याची विनंती करीत आहोत. आपण 1) ज्याच्या नावे प्रसाद घरपोच हवा असेल त्याचे संपूर्ण नांव व पत्ता, व्हॉटस्‌ॲप नंबर. 2) गोत्र व प्रसादाची संख्या ही माहिती कळवावी. देणगी शुल्क रोखीने संघाच्या कार्यालयात किंवा श्री परशुराम पतसंस्थेच्या कार्यालयात अथवा संघाच्या अधिकृत बँक खात्यात जमा करावेत अथवा **QR** कोड स्कॅन करुन भरु शकता.

**बँकेचे नाव – बँक ऑफ इंडिया**

**बँकेची शाखा – महाद्वार रोड, कोल्हापूर.**

**खाते नंबर –** 09021011001 6181

**IFSC Code - BKID0000902**

कृपया बँकेत पैसे जमा केल्यास रिमार्क जागेत आपले नाव अवश्य लिहावे. **संघाचे कार्यवाह श्री. केदार जोशी यांच्या** 7588839527 **या नंबरवर गुगल पे द्वारे देणगी शुल्क जमा करु शकता.** आपण आपला संदर्भ नमूद करावा. देणगी शुल्क जमा केल्यावर युटीआर अथवा फोन करुन कळवावे. आपण वेळेत नोंदणी करुन या '**घरपोच प्रसाद योजनेचा**' लाभ घ्यावा असे आवाहन संघाचे अध्यक्ष मकरंद करंदीकर, उपाध्यक्ष प्रसाद भिडे व कार्यवाह केदार जोशी यांनी केले आहे.

**नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क :**

*** संतोष साने** 8459019091 *** हृषिकेश लिमये** 9404260470

### कोल्हापूर रोजगारनिर्मिती, निर्यातीचे हब बनेल

कोल्हापूर : कोल्हापूर हा कृषी क्षेत्रात देशातील सर्वांत प्रगत जिल्हा आहे. अभियांत्रिकी उत्पादने, शुद्ध साखर आणि कापड उत्पादनात या जिल्ह्याची मोठी आघाडी आहे. वाढती मध्यमवर्गीय लोकसंख्या, कुशल कामगार, कमी ऑपरेशनल खर्च आणि सुधारत असलेली पायाभूत सुविधा यांमुळे कोल्हापूर रोजगारनिर्मिती अन् निर्यातीचे हब बनेल असा विश्वास एक्झिम बँकेच्या उपव्यवस्थापकीय संचालक दीपाली अग्रवाल यांन व्यक्त केला.

**महाप्रसादासाठी येणारा अपेक्षित अंदाजे खर्च** (रुपयांत)

**(८०० ते १,००० भक्तांसाठी)**

| | | |
|---|---|---|
| 1) | तांदूळ व डाळ | 12,000 |
| 2) | रवा व कणिक | 6,000 |
| 3) | साखर | 6,000 |
| 4) | बेसन पीठ | 4,000 |
| 5) | तेल डबे | 11,000 |
| 6) | वनस्पती तेल | 9,000 |
| 7) | मसाले व इतर वस्तू | 11,000 |
| 8) | ड्रायफ्रुटस् | 7,000 |
| 9) | दूध | 4,000 |
| 10) | दही | 3,000 |
| 11) | चहा, कॉफी, मसाला | 2,000 |
| 12) | भाजीपाला | 10,000 |
| 13) | बटाटे, फळे | 5,000 |
| 14) | नारळ | 2,000 |
| 15) | गॅस सिलेंडर | 3,000 |
| 16) | मिनरल वॉटर | 7,000 |
| 17) | तूप | 5,000 |
| 18) | पक्वान्न (गोड पदार्थ) | 25,000 |
| 19) | मजुरी अंदाजे | 50,000 |

### श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त १२५ रुपयांचे नाणे

नवी दिल्ली : जनसंघाचे संस्थापक व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त १२५ रुपयांचे नाणे जारी करण्यात येणार आहे. श्यामा प्रसाद मुखर्जी देशाचे पहिले उद्योग व पुरवठा मंत्री होते. त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळात तीन वर्षांपर्यंत मंत्री म्हणून कार्य केले होते. त्यांनी अनेक कामे केली असून ती नंतर भारताच्या औद्योगिक विकासात महत्त्वाची ठरली. यंदा देश श्यामा प्रसाद मुखर्जी यांची १२५ वी जयंती साजरी करीत आहे. ही जयंती आणखी भव्यदिव्य करण्यासाठी भारत सरकार श्यामा प्रसाद मुखर्जी यांचे चित्र असलेले १२५ रुपयांचे स्मारक नाणे जारी करणार आहे.

### सर्व नागरी सुविधा केंद्रात मिळणार जन्म-मृत्यू दाखले

कोल्हापूर - महापालिकेच्या मुख्य इमारतीसह सर्व नागरी सुविधा केंद्रांमध्ये जन्म-मृत्यूचे दाखले मिळण्यासाठी त्याचे विकेंद्रिकरण केले आहे. हे दाखले यापूर्वी महापालिका मुख्य इमारतीतील नागरी सुविधा केंद्रात उपलब्ध होते. प्रशासकीय कामकाज गतिमान कार्यक्रमांतर्गत दाखले वितरित करण्याची सुविधा महापालिकेमार्फत केली आहे. विभागीय कार्यालयातील सर्व नागरी सुविधा केंद्रे १ ते ४ येथे दाखले मिळणार आहेत. यापुढे नागरिकांनी जवळच्या नागरी सुविधा केंद्रात जाऊन या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन जन्म व मृत्यू नोंदणी विभागामार्फत केले आहे.

### कडधान्य पिकांसाठी राज्यांतर्गत पीक स्पर्धा

कोल्हापूर : प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन, उत्पादन वाढीसाठी कृषी विभागामार्फत राज्यांतर्गत पीक स्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम २०२५ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, मूग, उडीद, सोयाबीन या ११ पिकांसाठी स्पर्धा होईल. अधिक माहितीसाठी कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा असे आवाहन कृषी उपसंचालक नामेदव परीट, जिल्हा अधीक्षक जालिंदर पांगरे यांनी केले.

# हीरक महोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ आणि 'पंचरत्न' वधूवर सूचक केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी निमित्ताने ब्राह्मण वधूवर विशेषांक प्रसिद्ध होणार

# वधू-वर अंकासाठी विजयादशमीपर्यंत नांव नोंदणी करा ! दिवाळीत विवाह जमवा !!

**हीरक महोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ** आणि महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, व मध्यप्रदेश या राज्यांत अनेक शाखांद्वारे 'लोकप्रिय' असलेले, वधूवर व पालकांच्या विश्वासास पात्र ठरलेले **'पंचरत्न वधूवर सूचक केंद्र, कोल्हापूर'** यांच्या संयुक्त विद्यमाने ब्राह्मण वधूवर विशेषांक प्रसिद्ध करणार आहे. हा अंक पुस्तक स्वरूपात ऑक्टोबर 2025 महिन्यात प्रकाशित करणार आहोत. नवीन रुपात, नवीन आकारात आणि अंदाजे शेकडो स्थळांबरोबरच अत्यंत उपयुक्त माहितीसह प्रसिद्ध होणारा हा अंक मासिक स्वरूपात आहे. उत्कृष्ट छपाई, शेकडो वधुवरांची माहिती त्यांच्या संपर्क फोन नंबरसहित देणार आहोत. या अंकामध्ये ब्राह्मण पोट-शाखेतील देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, सारस्वत, सीकेपी तसेच प्रथमवर, घटस्फोटित, सापत्य, विधवा, विधूर अशा सर्व प्रकारची स्थळे प्रसिद्ध करणार आहोत.

**हीरक महोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ व 'पंचरत्न'** यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशित होणाऱ्या या वधू-वर विशेषांकात ज्या ब्राह्मण वधूवरांना आपली माहिती फोटोसह प्रसिद्ध करावयाची आहे, त्यांनी **विजयादशमी शनिवार दि. 12 ऑक्टोबर 2024 पर्यंत नावनोंदणी करावी.** कोल्हापूर चित्पावन संघ, 428 'बी' वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर-416012. फोन नं. 0231-2546225, 2991673, 7620546225 किंवा 'पंचरत्न'च्या पाच राज्यांतील कोणत्याही शाखांमधून प्रत्यक्ष संपर्क साधून आजच आपली नोंदणी करावी. पंचरत्न 0231-2621001/9881291863

**नावनोंदणी शुल्क – रु. 500 फक्त.**

**अंकाची किंमत : रु. 200 राहील.**

**(कुरिअर चार्जेस वेगळे)**

**वधू-वर अंकात नावनोंदणी करताना** शाखांमध्ये जाऊन संस्थेच्या विहित नमुन्यातील फॉर्म भरावा. फोटो देताना अलीकडील काळातील रंगीत फोटो द्यावा. फोटोला पिन मारू नये. फोटोमागे पूर्ण नाव लिहावे व फोटो चौकोनात चिकटवावा.

**ई-मेलवर नोंदणी करणाऱ्यांना –** ज्या शहरात 'पंचरत्न'ची शाखा नाही त्या वधूवरांनी अंकातील फॉर्म सुवाच्य अक्षरात भरून स्कॅन करून पाठवावा. स्कॅन केलेला फॉर्म व रंगीत फोटो **panchvivahkop@gmail.com** या 'पंचरत्न'च्या ई-मेलवर स्वतंत्ररित्या पाठवावा किंवा फॉर्म आणि फोटो 9881291863 या व्हॉट्सॲप नंबरवर पाठवावा. फोटोखाली नाव लिहावे. फोटो पाठवताना तो स्वच्छ व व्यवस्थित पाठवावा. फोटो अस्वच्छ अथवा डाऊनलोड न झाल्यास फोटो येणार नाही. फक्त माहिती येईल याची नोंद घ्यावी. ई-मेल केल्यावर मुख्यालयात 0231-2621001 या नंबरवर सकाळी 11 ते सायं. 6 पर्यंत कळवावे.

**नेट बँकिंग पेमेंट –** ज्या शहरात पंचरत्नची शाखा नाही किंवा ज्या वधूवरांना नेटवरून फॉर्म व फोटो पाठवायचे आहेत त्यांनी नेट बँकिंग मार्फत रक्कम भरुन नांव नोंदणी करावी. त्यासाठी **'पंचरत्न वधूवर सूचक केंद कोल्हापूर'** या नावाने **आय.डी.बी.आय. बँकेमध्ये चालू खाते क्र. 463102000006248** तसेच **(IFSC : IBKL 0000463) या खात्यावर आपले पैसे जमा करावेत. फोटो व माहिती द्यावयाची असेल त्यांनी 500 रुपये वर दिलेल्या बँक खात्यावर भरावेत. दिवाळी अंक घरपोच पाहिजे असल्यास कुरियर खर्च महाराष्ट्रासाठी 50 रुपये व महाराष्ट्राबाहेर रुपये 80 जादा द्यावा लागेल.** रक्कम भरल्यावर आपले नांव, ज्या शहरातून रक्कम भरली आहे त्या शहराचे नांव व रक्कम भरलेली तारीख मुख्यालयात त्वरित कळवावी. णढव नंबर मुख्यालयात त्वरित कळवावा. **अधिक माहितीसाठी किंवा गुगल-पे करण्यासाठी 9881291863 या नंबरवर संपर्क करा.** 'पंचरत्न'च्या मुख्यालयात 0231-2621001 **या नंबरवर सकाळी 11 ते सायंकाळी 6 पर्यंत संपर्क साधावा.**

कोल्हापूर चित्पावन संघामार्फत वधूवर विशेषांक हवा असल्यास अंकाची किंमत रु. 200 + कुरिअर खर्च संस्थेच्या पुढील बँकेमध्ये जमा करावेत व संस्थेमध्ये फोन करुन कळवावे.

**※ बँकेचे नाव – बँक ऑफ इंडिया**

**※ बँकेची शाखा – महाद्वार रोड, कोल्हापूर.**

**※ खाते नंबर –** 090210110016181

**※ IFSC Code - BKI0000902**

आजच नावनोंदणी करा, विवाहयोग जुळवून आणा !

या वधू-वर विशेषांकात ब्राह्मण वधूवरांनी जास्तीत जास्त नोंदणी करावी, असे आवाहन कोल्हापूर चित्पावन संघाचे अध्यक्ष मकरंद करंदीकर, उपाध्यक्ष प्रसाद भिडे, कार्यवाह केदार जोशी व 'पंचरत्न'च्या संचालिका सौ. श्रुती श्रीकांत लिमये आणि व्यवस्थापक सौ. सोनिया सोनटक्के कुलकर्णी यांनी केले.

## वाचकांच्या आवडीचे 'नवस्नेह' आता व्हॉटस्‌ॲपवर

हीरक महोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे लोकप्रिय मासिक 'नवस्नेह' वाचनीय व संग्रही होत आहे. या मासिकाच्या सभासदांची व वाचकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वाचक या अंकाची नेहमी आतुरतेने वाट पहात असतात. परंतू काही तांत्रिक अडचणीमुळे काही वाचकांना हा अंक वेळेत घरपोच मिळत नाही. हा अंक पीडीएफ स्वरूपात सभासदांच्या व्हॉटस्‌ॲप नंबरवर पाठवावा, अशी अनेक वाचकांची मागणी व सूचना आहे. याचा आदर ठेवून योग्य ती कार्यवाही करण्याचा आमचा मानस आहे. त्यासाठी सभासदांनी आपले व्हॉटस्‌ॲप नंबर संस्थेकडे नोंदवावेत, ही विनंती.

– संपादिका, **नवस्नेह**

## श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळ्याचे लाईव्ह प्रक्षेपणाची सोय

कोल्हापूर चित्पावन संघातर्फे मागील दोन वर्षापासून नवीन उपक्रम सुरू केला आहे. शिवाय आपले ज्ञाती बांधव केवळ भारतातच नाही तर परदेशातही वास्तव्यास असतात. सर्व भक्तांना हा सोहळा घरात बसून पहाता यावा यासाठी मागील वर्षापासून श्री अष्टमी सोहळ्याचे सायंकाळी फेसबुक लाईव्ह व युट्यूबवरून दाखवण्याची मोफत सोय केली आहे. हा सोहळा **QR** स्कॅन करुन सर्व भक्तांना पाहता येणार आहे. जास्तीत जास्त भक्तांनी याचा लाभ घ्यावा व आपल्या प्रतिक्रिया नोंदवाव्यात. या थेट प्रक्षेपणासाठी आपल्या ज्ञातीतील श्री. तुषार दिवेकर, श्री. महेश कुंटे, समीर गोवंडे यांनी पुढाकार घेतला.

## उत्तूर बसस्थानकासाठी चार कोटी रुपयांचा निधी

उत्तूर – येथील बस स्थानकाची इमारत जुनी व जीर्ण झाली आहे. त्यामुळे या इमारती पाहून तेथे नवीन बसस्थानकाच्या इमारतीची निर्मिती करण्यात येईल. बांधकामासाठी चार कोटींचा निधी मंजूर झाला आहे. उत्तूर बसस्थानकावर १६ तास प्रवाशांची वर्दळ असते. बसफेऱ्या व प्रवाशांया तुलनेत सुविधा अपुऱ्या पडत आहेत. बसस्थानकाची इमारत जीर्ण झाली होती. ही इमारत प्रवाशांसाठी अपुरी पडत होती. नागरिकांचा एसटीकडे ओढा असल्याने भारमानही चांगले आहे. प्रवाशांसाठी वातावरण सुखकारक असावे, बसस्थानक सर्व सोयींनी सुसज्ज असावे या उद्देशाने नवी इमारत बांधली जाणार आहे. वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्या प्रयत्नातून चार कोटींचा निधी मंजूर आहे. सध्या जागेचे सपाटीकरण केले आहे. वर्षभरात बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पुनर्बांधणीनंतर सध्याच्या बसस्थानकाचे रूप पालटणार असल्याची आजरा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष वसंतराव धुरे यांनी सांगितले.

## सकाळी कडकडीत ऊन, दुपारनंतर ढगांची गर्दी

कोल्हापूर – शहर आणि परिसरात सकाळी कडकडीत ऊन आणि दुपारनंतर ढगाळ हवामान आणि तुरळक पाऊस असे चित्र आहे. यामुळे एका दिवसात उन्हाळा, हिवाळा, पावसाळा अशा तीन हंगामांचा अनुभव मिळाला. जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये पूर्णपणे उघडीप राहिली. तेथे खरीप पीक पेरणीच्या मशागतीच्या कामाला गती आली आहे. गेल्या दोन-तीन दिवसांपासून शहर परिसरात ऊन-पावसाचा खेळ सुरू आहे. कार्यालयात, दुकानात फॅनची गरगर सुरू होती. मात्र दुपारनंतर तुरळक पाऊसाला सुरुवात झाली. हवेतील उष्णता कमी होऊन गारवा तयार झाला.

'प्राजक्त' हे सायंदैनिक मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांनी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, 287 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-416002 येथे छापून प्राजक्त कार्यालय, 287 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-416002 येथून प्रसिध्द केले.
**संपादक : प्रफुल्ल डबीर. फोन : 8623053750**
**email -** prajaktaweekly@gmail.com
RNI NO. : **M-6 (1457) / 70-RNI**
**Postal Reg. No. KLR 136/24-26 Posted in Kolhapur RMS**

### फक्त सभासदांचे मुलामुलींसाठी

## कोल्हापूर चित्पावन संघाच्यावतीने शैक्षणिक पारितोषिक योजना २०२४-२५

कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे सभासदांचे व त्यांच्या घरातील मुलामुलींच्या शैक्षणिक व इतर कलागुणांचे कौतुक करत आहे. यावर्षी हा उपक्रम शनिवार, दि. २६ जुलै रोजी ब्राह्मण सभा करवीर येथे आयोजित करणेत आला आहे. या गुणगौरव सोहळ्यासाठी संबंधीतांनी मंगळवार, दि. १५ जुलै २०२५ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज व त्या संबंधातील आवश्यक ती कागदपत्रे जोडून जी वेळेत संस्थेच्या कार्यालयात जमा करावी असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष श्री मकरंद करंदीकर व कार्यवाह श्री. केदार जोशी यांनी केले आहे. संघाची कार्यकारिणी तसेच शैक्षणिक समिती पारितोषिकांबाबत योग्य निर्णय घेईल. अर्जदार (पालक) संघाचे सभासद असणे आवश्यक आहे. मुदतीनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

## एस.टी.चा हँडब्रेक सुटल्याने दोन दुचाकींना धडक

इचलकरंजी : येथील शहापूर एस.टी. आगारात एका एस.टी.चा हँडब्रेक सुटल्याने एस.टी. थेट पुढे जात समोर उभ्या असलेल्या दोन दुचाकींवर आदळली. या अपघातात १ लाख १० हजार रुपयांचे नुकसान झाले. या प्रकरणी एस.टी. चालक दिगंबर प्रकाश गवळी, रा. बिरदेवनगर, रेंदाळ यांच्यावर शहापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इचलकरंजी ते सोलापूर ड्युटीवरील बस एअर कॉम्प्रेसरमध्ये हवा भरत असताना चालकाने गाडी सुरू स्थितीतच सोडली आणि हॉर्न बिघडल्याची तक्रार नोंदवण्यासाठी तो निरीक्षण विभागात गेला. त्यावेळी हँडब्रेक सुटल्याने हा अपघात झाला. त्यामध्ये दोन दुचाकींना धडकली. याबाबत शिवाजी धारवट, सहायक वाहक निरीक्षक, इचलकरंजी आगार यांनी फिर्याद दिली आहे.



## 'नवस्नेह' दिवाळी अंकात २०२५ साठी जाहिरात द्या !

**सन्माननीय महोदय,**

कोल्हापूर चित्पावन संघाचे नवस्नेह मासिक अल्पावधीतच लोकप्रिय झाले आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांचे लेख, कथा, कविता, मुलाखत, विनोदी किस्से, नव्या पाककृती, अशा अनेक पैलूंनी, विविध अंगानी सजलेला व संग्राह्य ठेवावा असा 'नवस्नेह' दिवाळी अंक आपल्या भेटीस ऐन दिवाळीत येत आहे. हा अंक नेहमीप्रमाणे जगभरातील कोणालाही पहाता यावा यासाठी आपल्या संस्थेच्या वेबसाईटवरही पहाता येणार आहे. आपल्या या स्वतःच्या दिवाळी अंकात आपल्या उद्योगाची जाहिरात असावी असे आम्हास मनापासून वाटते. आपणही यास नक्की सहकार्य कराल याची खात्री आहेच. आपल्यासारख्या दानशूर व्यक्तींमुळेच या अंकास खरा अर्थ प्राप्त होत आहे. आपणास या पत्राद्वारे विनंती करत आहोत की, आपण आपल्या उद्योगाची जाहिरात लवकरात लवकर संस्थेत पाठवून मोलाचे सहकार्य करावे.

**※ अंकाची तांत्रिक माहिती खालीलप्रमाणे : अंकाचा आकार : क्राऊन साईज (7'x10'')**

**कव्हर पान नं. 2 व 3 रंगीत : प्रत्येकी रु.10 हजार फक्त.**

| | | |
|---|---|---|
| **पूर्ण रंगीत पान :** रु.7,000 | **अर्धे रंगीत पान :** रु. 5,000 | **पाव रंगीत पान :** रु. 3,000 |
| **कृष्णधवल पूर्ण पान :** रु. 2,000 | **कृष्णधवल अर्धे पान :** रु. 1,200 | **कृष्णधवल पाव पान :** रु. 800 |
| **कृष्णधवल व्हिजिटींग कार्ड साईज :** रु. 500 | **सदिच्छा एक ओळ :** रु. 200 | |

आपली जाहिरात संस्थेत प्रत्यक्ष, संस्थेच्या ई-मेलवर अथवा व्हॉट्स ॲपवर पाठवू शकता. आपल्या संस्थेचा लोगोही पाठवू शकता. आपली जाहिरात लवकरात लवकर म्हणजेच शनिवार दि. 20 सप्टेंबर 2025 पर्यंत पाठवून द्यावी, ही पुनःश्च विनंती. कळावे, लोभ आहेच वृध्दिंगत व्हावा ही विनंती.

आपले स्नेहांकित

**मकरंद करंदीकर**, अध्यक्ष **केदार जोशी**, कार्यवाह **प्रसाद भिडे**, उपाध्यक्ष

**विशेष सूचना :** जाहिरात दिल्यावर 8805355200 किंवा 7588839527 या नंबरवर कळवावे.
आपली जाहिरात PDF किंवा JPJE फॉर्ममध्ये पाठवावी. ज्यामुळे मजकुरातील चुका टाळता येतील.